संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ...तर एसटीला सापत्न वागणूक का?

**अलिकडेच** मुख्यमंत्र्यांनी मुंबईतल्या बेस्ट उपक्रमाच्या आधुनिकीकरणासाठी एक स्वतंत्र बैठक बोलवली होती. मुंबईचे आंतरराष्ट्रीय महत्त्व सगळ्यांनाच मान्य आहे. मुंबईच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आणि प्रचंड गर्दी असलेल्या या महानगरात सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक भक्कम आणि कार्यक्षम असणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे ठरते. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या आराखड्यानुसार बेस्ट उपक्रम सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचा सरकारचा विचार दिसतो. प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांनी या विषयात लक्ष घालून बेस्टच्या सुधारणांविषयी पुढाकार घ्यावा ही गोष्ट निश्चितच चांगली आहे. बेस्टची सुधारणा हे जर विकसित महाराष्ट्राच्या आराखड्यातला भाग असेल तर मग महाराष्ट्रासाठी तितकीच महत्त्वाची असलेली राज्य परिवहन मंडळाची बससेवादेखील सुधारली पाहिजे. अशाच प्रकारची बैठक मुख्यमंत्र्यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी घेतली पाहिजे. अलिकडे त्यांनी घेतलेल्या बैठकीत राज्य परिवहन मंडळात पुढच्या दोन तीन वर्षामध्ये अधिकाधिक इलेक्ट्रीक बसेस सुरू करण्यावर भर दिला आणि राज्यात अधिकाधिक चार्जींग स्टेशन उभारण्यासाठी कार्यक्रम हाती घेण्याचेही निर्देश दिले. परंतु केवळ इलेक्ट्रीक बसेसच्या खरेदीतून राज्य परिवहन मंडळाची परिस्थिती सुधारणार नाही. कारण आज या महामंडळाची जी काही दूरावस्था आहे. त्यात एसटी बसेस, आगारांची अस्वच्छता, कर्मचाऱ्यांच्या वेतनापासून ते त्यांच्या पोषाखापर्यंत त्यांच्या अरेरावीपर्यंत बऱ्याच सुधारणांची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातल्या एसटी बसेस त्यांचे वेळापत्रक या सगळ्याच गोष्टी इतक्या धन्य स्वरूपाच्या आहेत की, प्रामुख्याने ग्रामीण भागातील एसटीचा कारभार हा रामभरोसे चालत असल्याचेच म्हणावे लागते. बेस्टच्या आधुनिकीकरणासाठी घेतला गेलेला पुढाकार आणि एसटी महामंडळाकडे होत असलेले दुर्लक्ष यातली तफावत नाकारता येणार नाही. बेस्टला मिळणारी खास वागणूक आणि एसटीबाबतचा हा सापत्न भाव मुख्यमंत्र्यांनीच लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. जवळपास शंभर वर्ष जुनी असलेली महाराष्ट्राच्या एसटी बससेवा, एसटी बस व्यवस्थापनामध्ये आणि नियोजनामध्ये अमूलाग्र परिवर्तनाची वेळ आलेली आहे.

### विकसित महाराष्ट्र आणि ग्रामीण भाग

विकसित महाराष्ट्राचे चित्र रंगवताना ते वारंवार शहर आणि महानगर केंद्रीत होते आहे. शहरांची लोकसंख्या अपुऱ्या पडणाऱ्या सेवासुविधा, रोजगारासाठी शहरांकडे धावणारे लोंढे नियोजनाचाच अभाव असल्याने या महानगरांना येणारा बकालपणा, या सगळ्या गोष्टी लक्षात घ्याव्याच लागतात. तरीदेखील राज्याच्या विकास कार्यक्रमावर केल्या जाणाऱ्या खर्चाचा विचार केला तर पुन्हा एकदा ग्रामीण भाग कमालीचा दुर्लक्षित होत असल्याचे सिद्ध होते. पायाभूत सुविधांच्या नावाखाली शहरांवर विकासनिधीचा पाऊस पडत असतो, तर ग्रामीण भागात मूलभूत सुविधांसाठी याच निधीचा दुष्काळ असतो. समतोल विकासाचे केवळ बुजगावणे दाखवले जाते. परंतु योजनापूर्वक खेडी तालुका किंवा जिल्ह्याची ठिकाणेसुद्धा मूलभूत सुविधांनी परिपूर्ण झाली पाहिजेत. असे नियोजन विकसित महाराष्ट्राच्या ध्येयधोरणात दिसत नाही. मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर, याच मोजक्या शहरांवर विकासकामांची बरसात होते आहे. मग इथल्या मेट्रो सेवा, सार्वजनिक बससेवा किंवा अगदी आता तर पॉड टॅक्सीसारखा प्रकार मुंबईत सुरू केला जातो आहे. त्यासाठीसुद्धा बऱ्याच मोठ्या निधीची तरतूद केली जाते आहे. अगदी समृद्धी महामार्ग तयार करताना मुंबई आणि नागपूरचाच प्रामुख्याने विचार झाला आणि या राजधानी उपराजधानीतल्या प्रवासाचा वेळ वाचावा एवढाच उद्देश ठेवला गेला. या महामार्गाला लागून असलेली खेडीसुद्धा विकसित होती असेदेखील मधाचे बोट लावले गेले होते. परंतु या महामार्गावरच्या छोट्या गावांच्या विकासासंदर्भात अजूनही कोणतीच ठोस योजना मांडली गेलेली नाही. केवळ महानगरांच्या समृद्धीवर अधिक लक्ष दिले जाते आहे. तोच प्रकार मुंबईच्या विविध विकासकामांबाबत म्हणता येईल. आज अगदी नाशिकमधली शहर बससेवासुद्धा सुधारता आलेली नाही. खाजगी कंपनीच्या भरोशावर तिथली सार्वजनिक परिवहन सेवा सोडून दिली गेलेली आहे. बेस्टची सुधारणा झाली पाहिजे. पण संपूर्ण राज्याच्या विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवत असताना राज्य परिवहन महामंडळ जे सामान्य माणसासाठी सर्वाधिक महत्त्वाचे ठरलेले आहे. त्यासंदर्भात तितक्याच प्राधान्याने विचारविनिमय झाला पाहिजे.

### बेस्टची स्थिती समाधानकारक

आज राज्य परिवहन महामंडळाकडे स्वतःची आगारे आहेत. लाखो एकर जागा या आगारांनी व्यापलेली आहे. परंतु आज राज्यात एकही आदर्श बसस्थानक दाखवता येत नाही. केंद्र सरकारने सामान्य माणसाचा विचार करूनच रेल्वे सेवेमध्ये अमूलाग्र सुधारणा केल्या. देशभरातल्या रेल्वे स्थानकांचे चेहरे मोहरे बदलत आहेत. नव्या आधुनिक पद्धतीच्या गाड्या येत आहेत. अगदी तिकीट बुकिंगसुद्धा सहजपणे घरबसल्या होते आहे परंतु रोज जवळपास दीड ते दोन कोटी प्रवाशांची ने-आण करणाऱ्या एसटी बससेवेकडे लक्ष द्यायला सरकारला वेळ नाही. डिजिटल महाराष्ट्राचे कौतुक करताना राज्य परिवहन सेवेत अजूनही डिजिटल कारभार पूर्णपणे जुळलेला नाही. तालुका जिल्हा स्तरावर आरक्षणाबाबतीत प्रचंड गोंधळ असतो. वेळापत्रक तर कधीच पाळले जात नाही. आधुनिकता आणि एसटी बससेवा यांचा दूरान्वये संबंध नाही असेच आजचे चित्र पाहायला मिळते. एसटीच्या तुलनेमध्ये मुंबईची बेस्ट सेवा ही कितीतरी कार्यक्षम आणि सुधारलेली आहे. राज्य सरकारने युद्धपातळीवर राज्य परिवहन मंडळाच्या कारभारात सुधारणा करायला हवी. अजूनही एसटी बसमधल्या आसनांच्या बाजूला आमदार किंवा खासदारांसाठी राखीव असे लिहिलेले असते. परंतु एकही लोकप्रतिनिधी किंवा अगदी नगरसेवक, सरपंचसुद्धा आता एसटीने प्रवास करत नाही. याचा अर्थ एसटीच्या व्यवस्थापनामध्ये किती अगदी मुळापासूनच सुधारणा कराव्या लागणार आहेत. लोकांचा विश्वास असलेली आणि लोकांची गरज असलेली एसटी सेवा जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवली जाते आहे.